**<u>न्यायनिर्णय नि.क्र.०६ सलग</u>**

(पारीत दिनांक २७/०३/२०२६)

आरोपीवर महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई) अन्वये खटला चालविण्यात आला.

२) आरोपीच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. माझ्यासमक्ष निर्माण झालेले मुद्दे व त्यावरील निष्कर्ष खालील प्रमाणे ;

| **<u>अ.क्र.</u>** | **<u>मुद्दे</u>** | **<u>निष्कर्ष</u>** |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने असे सिध्द केले काय, दि.२८/०६/२०२५ रोजी संध्याकाळी ०६.२० वाजताच्या दरम्यान मौजे निगडी काठी, श्रीवर्धन येथे आरोपी तिच्या ताब्यात एक प्लॅस्टीक कॅन ज्यामध्ये ०९ लीटर गावठी हातभट्टीची दारु असा एकुण रुपये ८००/– किंमतीचा मुद्देमाल विना परवाना अवैधरीत्या विक्री करण्याचे उद्देशाने स्वतःजवळ बाळगुन मिळुन आला ? | नाही |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

**कारणमिमांसा**

**<u>मुददे क्रमांक १ व २ करिता</u>** :–

३) अभियोगपक्षातर्फे पंच साक्षीदार म्हणुन तपासण्यात आलेला प्रणाली प्रणय भाटकर (अ.सा.क्र.१) व सागर नंदकुमार करदेकर (अ.सा.क्र.२) यांच्या साक्षीचे अवलोकन केले असता त्यांनी आपल्या साक्षीदरम्यान अभियोगपक्षाच्या केसचे कोणतेही समर्थन केलेले नाही. याउलट

त्यांनी त्यांचे अभीयोगपक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासणीत हे स्पष्टपणे नाकारले की, पोलिसांनी त्याचे समक्ष दि.२८/०६/२०२५ रोजी सदरच्या ठिकाणी आरोपीच्या ताब्यातून सदरचा मुद्देमाल जप्त केला होता अगर तसा कोणताही जप्ती पंचनामा त्याचे समक्ष केला होता. पंचनाम्यातील मजकुर त्यांनी स्पष्टपणे नाकारला आहे. एकंदरीत पाहता श्री. प्रणाली प्रणय भाटकर (अ.सा.क्र.१) व सागर नंदकुमार करदेकर (अ.सा.क्र.२) यांच्या साक्षी अभियोग पक्षास घटनास्थळ पंचनामा सिध्द करण्यास काहीच उपयोगाची ठरली नाही. थोडक्यात पंच साक्षीदारांनी फिर्यादीचे पुराव्याचे समर्थन केलेले नाही.

४) प्रस्तुत खटल्यात अभियोग पक्षातर्फे आरोपीकडुन जप्त केलेले द्रव्य हे दारुच होती हे दाखविणारा रासायनिक पृथ्थकरणाचा दाखला अभिलेखावर दाखल करणे अत्यंत गरजेचे होते. परंतु असा कोणताही दाखला अभियोगपक्षातर्फे आजतागायत अभिलेखावर दाखल करण्यात आलेला नाही. आरोपीकडुन जप्त केलेला मुद्देमाल ही दारु होती हे रासायनिक पृथ्थकरणच्या दाखल्या शिवाय शाबित होणार नाही. शिवाय कामात सबळ पुरावा नसल्यामुळे इतर साक्षीदार तपासण्यात आलेले नाहीत म्हणुन अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. एकंदरीत पाहता अभियोगपक्ष आरोपीवरील गुन्हा संशयापलीकडे सिध्द करण्यास असमर्थ ठरल्याने मी मुद्द क्र.१ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

५) वरील मुद्दा क्र.१ मध्ये दिलेल्या कारणमिमांसेप्रमाणे अभियोगपक्ष सबळ पुराव्याअभावी आरोपीविरुध्दचा गुन्हा पर्याप्त संशयापलिकडे जावुन शाबित करण्यास असमर्थ ठरल्याने आरोपी हा गुन्हयातुन निर्दोष मुक्त होण्यास पात्र ठरला आहे. सबब मुद्दा क्र.२ चे उत्तरार्थ खालील आदेश करण्यात येतो.

## <u>आ दे श</u>

१) आरोपी प्राजक्ता प्रितम पोलेकर यांची भारतीय नागरी सुरक्षा संहिता, २०२३ च कलम २७८(१) अन्वये महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम १९४९ चे कलम ६५(ई) अंतर्गत शिक्षेस पात्र असणाऱ्या गुन्हयातुन दोषमुक्त करण्यात येते.

२) आरोपीचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येते.

३) प्रकरणी जप्त मुददेमाल एक प्लॅस्टीकचा कॅन ज्यामध्ये ०९ लीटर गावठी हातभट्टीची दारु हे अपिल कालावधीनंतर नियमाप्रमाणे योग्य त्या विल्हेवाटीकरिता अधिक्षक,

राज्य उत्पादन शुल्क, रायगड अलिबाग यांचेकडे पाठविणेत यावे.

४) भारतीय नागरी सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४८१ च्या पुर्ततेकामी आरोपीने रु. १५,०००/- ची जामीन दयावयाचा आहे.

५) प्रस्तुत न्यायनिर्णयाची प्रत मा. जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग यांचेकडे पाठविण्यात यावी

(सदरचा न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला. )

SAMEER KADER SHAIKH Digitally signed by SAMEER KADER SHAIKH Date: 2026.03.27 18:32:53 +0530

दिनांक- २७/०३/२०२६ (एस.के.शेख)

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, श्रीवर्धन